## अर्ज निशाणी क्रमांक ३९ खालील आदेश

**( पारीत केलेला दिनांक १४.१०.२०२२)**

०१. प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्रमांक ०४ ने मोजणीदाराचा उलटतपास घेण्याकरिता मुदत मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

०२. वादीने, प्रतिवादी क्रमांक ०४ विरुध्द दिनांक **३०.०१.२०१९** रोजी दावा **विना कैफियत** चालवण्याचा आदेश झाला आहे, प्रतिवादी क्रमांक ०४ ने प्रस्तूत अर्जासोबत जवाबदावा दाखल केलेला नाही, मोजणीदार साक्षीदार हजर आहे. म्हणून अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी क्रमांक ०४ तर्फे **विधीज्ञ श्री. एस. आर. शेख** आणि वादीतर्फे **विधीज्ञ श्री. व्ही. एम. वागदरे** यांचा युक्तिवाद ऐकला.

०४. अभिलेखावरुन असे दिसते की, प्रतिवादी क्रमांक ०४ ला समन्स **नि.क्र.०६** हे बेलिफ अहवाल **नि.क्र.२०** अनुसार दिनांक **०३.०७.२०१८** रोजी जातीने बजावणी झाले आहे. प्रतिवादी क्रमांक ०४ हा दिनांक **१९.०७.२०१८** रोजी वकिलपत्र **नि.क्र.१३** अनुसार हजर झाला आहे. वादपत्र **नि.क्र.०१** चे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादी क्रमांक ०४ विरुध्द त्याला समन्स बजावणी झाल्याचा दिनांक **०३.०७.२०१८** पासून सहा महिन्यांनी दिनांक **३०.०१.२०१९** रोजी दावा **विना कैफियत** चालवण्याचा आदेश झाला आहे.

०५. प्रतिवादी क्रमांक ०४ ने आज रोजी वकीलपत्र **नि.क्र.३७** दाखल केले असून सोबत उलटतपासणीसाठी मुदतीचा अर्ज **नि.क्र.३९** दाखल केला आहे. वादीचा सरतपास **नि.क्र.२८** दिनांक **०६.१०.२०२१** रोजी पुर्ण होवून प्रतिवादींविरुध्द **उलटतपास नाही** असा आदेश दिनांक **२७.१०.२०२१** रोजी झाला आहे.

०६. वादीतर्फे अर्ज **नि.क्र.२९** अनुसार दिनांक **०८.१२.२०२१** रोजी मोजणीदाराला साक्ष समन्स काढले असून अनेक वेळा साक्ष समन्स विना तामिल प्राप्त झाले आहे.

०७. वादीने अर्ज **नि.क्र.३३** वरील आदेशानुसार साक्षीदाराला हातोहात समन्स नेवून समन्स बजावणी केली आहे.

०८. अशाप्रकारे दावा वादीतर्फे मोजणीदाराच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी क्रमांक ०४ ला दिनांक **०३.०७.२०१८** रोजी समन्स बजावणी होवून आज **सुमारे सव्वा चार वर्षे** झाली आहेत. प्रतिवादी क्रमांक ०४ ने आज रोजी हजर होत असतांना त्याचा शुध्द हेतू दाखवण्यासाठी अर्जासोबत कैफियत दाखल करणे आवश्यक होते. कैफियत जरी दाखल केली असती तरी देखील दावा निकाली होण्यास विलंब झालाच असता कारण कैफियत आल्यानंतर वाद मुद्दे स्थापन करुन पुन्हा वादीचा उलटतपास आणि त्याच्यातर्फे घेण्यात येणा–या साक्षीदारांचा उलटतपास करण्याची प्रतिवादींनी परवानगी मागणी केली असती. म्हणून प्रतिवादी क्रमांक ०४ ला वादीतर्फे हजर असलेला साक्षीदार म्हणजेच मोजणीदाराचा उलटतपास घेण्यासाठी मुदत दिल्यास वादीच्या हक्काचे उल्लंघन होणार आहे. म्हणून अर्ज **नि.क्र.३९** गुणहीन असल्यामुळे फेटाळण्यास पात्र आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.क्र.३९** खर्चासह फेटाळण्यात येतो.

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2022.10.15 11:07:35 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– १४.१०.२०२२.** **दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**